औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाची शुक्रवार दि. ९/१०/१९९२, रोजी झालेल्या ७६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत:

सभेत खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १]. श्री. ईश्वरराव भोसीकर | ... | सभापती/औरंगाबाद मंडळ. |
| २]. श्री. ज. वी. शहा. | ... | मुख्य अधिकारी/औ. . |
| ३]. श्री व्यंकटराव देशपांडे उर्फ नरु वारठाणकर. | ... | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |

उप-संचालक / नगर-रचना, औरंगाबाद, हे पूर्वसूचनेनुसार बैठकीत अनुपस्थित होते.

विषय: क्रमांक[१]: दिनांक: ८/९/९२, रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे:

ठराव क्र.: ४६३:

दिनांक: ८/९/९२, रोजी झालेल्या ७५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने सदरच्या कार्यवृत्तांतास मान्यता दिली.

विषय: क्रमांक: [२]: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे सप्टेंबर, १९९२, मध्ये वाटप करण्यात आलेल्या व शिल्लक असलेल्या गाळ्यांचा तपशिल.

ठराव क्र. ४६४:-

वरील विषयावर चर्चा होऊन मंडळाने माहे सप्टेंबर, १९९२, मध्ये वाटप केलेल्या व शिल्लक असलेल्या गाळ्यासंबंधी आढावा घेतला. सदरील गाळे वाटपासाठी त्वरीत प्रयत्न करण्यात यावे. असे ठरले.

मा. सभापतींच्या परवानगीने सभा संपली.

.......

 

तसेच दि. ११ व १२ नोव्हेंबर १९९२ रोजी महाराष्ट्र राज्याची मंत्रीमंडळ बैठक औरंगाबाद येथे संपन्न झाली. या बैठकीत गृहनिर्माण योजनांबाबत आढावा व पूढील दोन वर्षाच्या कार्यक्रमाबाबत चर्चा झाली. त्यामध्ये मराठवाडयातील नगरपरिषद हद्दीत सन १९९२-९३ व १९९३-९४ या आर्थिक वर्षात एकुण ५००० सदनिकाचे बांधकाम प्रस्तावित करण्यांत आले. सदर प्रस्तावास मंत्रीमंडळाने निर्णय घेवुन संमंती दिली.

मंडळाने प्रस्तावित केलेल्या ५००० सदनिकांच्या बांधकाम कार्यक्रमात गेवराई नगर परिषद हद्दीत ५२० सदनिकांच्या बांधकामाचा समावेश आहे.

शासनाच्या निर्णयानुसार गेवराई नगरपरिषद हद्दीत गृहनिर्माण योजना म्हाडातर्फे राबविण्यासाठी नगरपरिषदेने दि. १७.११.९२ रोजी एक विशेष बैठक आयोजित केली. सदर बैठकीत योजनेचे लाभार्थी, नगरपरिषदेचे अध्यक्ष व अधिकारी तसेच मंडळाचे उप अभियंता उपस्थित होते. बैठकीत मंडळाचे उप अभियंता यांनी लाभार्थींना, हडकोच्या कर्जविषयक, बांधकामाच्या काढलेल्या किंमती तसेच म्हाडामार्फत नोंदविण्यात येणारी ठोस मागणी इत्यादी बाबत माहिती दिली.

गेवराई नगरपरिषदेने दि. १७.११.९२ रोजी एक सभा घेतली. त्यात असा ठराव मंजूर केला की, नगरपरिषदेने योजनेसाठी संपादित केलेली जमीन रू. ३५,०००/- प्रति एकर प्रमाणे म्हाडास हस्तांतरित करण्यांत यावी. परंतु योजनेच्या आराखडयात पाणी पुरवठा, दुकान, केन्द्रासाठी, भाजी मार्केट इत्यादी जागा राखीव ठेवावी. व ही राखीव जमिन वगळुन उर्वरित जमिन म्हाडास हस्तांतरित करावी.

तसेच योजनेसाठी लागणा-या उपयुक्त सुविधां जसे रस्ते, वीज, इत्यादी योजनेच्या हद्दीपर्यंत पुरविण्याबाबत पण सदर मंजुर ठरावात अंतर्भाव आहे.

दि. १९.११.९२ रोजी मंडळाचे उप अभियंता व सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ यांनी जमिनीची समक्ष पाहणी केली. व नगरपरिषदेच्या अधिका-यांशी चर्चा केली. चर्चेतील मुद्दे :-

१] नगर परिषदेने मागणी अंदाज अजमाविलेला आहे. त्याचे सविस्तर विश्लेषण खालील प्रमाणे [आजची स्थिती].

[अ] गाळ्यांच्या त्यावेळच्या अंदाजित किंमतीच्या १० टक्के अनामत रकमेसह प्राप्त झालेले अर्ज.

| उत्पन्न गट | अनामत रक्कम | प्राप्त अर्ज. |
|---|---|---|
| अत्यल्प उत्पन्न गट. | रु. १५१५/- | ६८ |
| अल्प उत्पन्न गट.-१. | रु. ३०३०/- | १७ |
| अल्प उत्पन्न गट -२ | रु. ४५४५/- | ६७ |
| मध्यम उत्पन्न गट. | रु. १५१५०/- | २२ |
| | | १७४ अर्ज. |

[ब] अंशत: रकमेसह प्राप्त झालेले अर्ज.

अत्यल्प उत्पन्न गट - ६ [अनामत रक्कम रु. ७००/ते १०००/-]
अल्प उत्पन्न गट १ - ४ [अनामत रक्कम रु. १५०० ते २०००/-]
अल्प उत्पन्न गट २ -२४ [अनामत रक्कम रु. १६५० ते ३०००/-].
मध्यम उत्पन्न गट -२६ [अनामत रक्कम रु. २५०० ते १०,०००/-].
६० अर्ज.

[क] किरकोळ रकमेसह प्राप्त झालेले अर्ज.

अल्पल्प उत्पन्न गट - ३७ [अनामत रक्कम रु. २००/-]
अल्प उत्पन्न गट-१ - २२ [अनामत रक्कम रु. ३००/-]
अल्प उत्पन्न गट-२ - ७७ [अनामत रक्कम रु. ३००/-]
मध्यम उत्पन्न गट -१५० [अनामत रक्कम रु. ५००/-]
२८६

[एकुण अर्ज ५२०]

वरिल प्रमाणे एकुण ५२० अर्ज प्राप्त झालेले असून रु.१२,०६,८२३/- रक्कम नगर परिषदेकडे जमा झाली आहे.

२] प्रस्तावित गृहनिर्माण योजनेची जमिन स.क्र. ५३ मधील असुन त्याचे क्षेत्र ४.७८ हेक्टर आहे. जमिन गृहनिर्माण योजनेकरिता प्राथमिक पाहणीनुसार उपयुक्त आहे.

३] सदर योजनेचे आराखडे खाजगी वास्तुशास्त्रज्ञांकडुन नगरपरिषदेने करुन घेतले आहेत. त्या आराखड्यास नगररचना बोर्ड व हडको मुंबई यांनी मंजुरी दिलेली आहे. तसेच सर्वसाधारणपणें ते आराखडे स्वीकाराले असल्यामुळे त्यात बदल करण्याची गरज नाही असे वाटते.

वरिल सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तावित करण्यांत येते की,

१] प्रस्तावित जमिन ताब्यात घेवुन त्यासाठी नगरपरिषदेने मागितलेला मावेजा रू. ३५,०००/- प्रति एकर प्रमाणे देण्यासंबंधी, म्हाडा कायदा कलम ५२ अनुसार शिफारसीसह प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविण्यांत यावा.

२] मंजुर आरक्षणाप्रमाणे म्हाडा मार्फत योजना राबविण्यांत यावी.

३] म्हाडाच्या नियमानुसार ठोस मागणी अजमाविण्याकरिता जाहिरात देण्यासंबंधी मंडळाने आदेश द्यावेत.

मंडळाच्या मंजूरीस्तवं सादर.

न/२१११९२

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या गुरुवार दिनांक २६.११.९२ रोजी होणाऱ्या ७७ व्या सभेपुढील विषय

विषय क्र. ३:

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे नोव्हेंबर १९९२ मध्ये वाटप करण्यांत आलेल्या व शिल्लक असलेल्या गाळयांचा तपशिल.

बाब टिप्पणी

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे विविध ठिकाणी बांधुन वाटपासाठी तयार असलेल्या गाळे वाटपाचा योजना निहाय तपशिल मंडळाच्या अवलोकनार्थ पटलावर ठेवण्यांत आलेला आहे.

अहवालावरुन असे लक्षात येईल की, एकतर अर्जदारांचा प्रतिसाद कमी असल्यामुळे किंवा अर्जदाराने कागदपत्राची पुर्तता न केल्यामुळे किंवा रकमेचा भरणा न केल्यामुळे वाटप प्रक्रियेत विलंब लागत आहे.

करिता बाब टिप्पणी मंडळाच्या माहितीस्तव सादर.

. . . . .

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या गुरुवार
दिनांक २६.११.९२ रोजी होणाऱ्या ७७ व्या सभेपुढील विषय.

---

विषय क्र. ४:

मा. सभापतींच्या परवानगीने आयत्या वेळेस येणारे विषय.

---